9८२

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1976

## THE MAHARASHTRA DOG RACE-COURSES LICENSING ACT, 1976

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २१ जुलै १९७६ रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस्. डब्ल्यु. धुरंधर,
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1976

## AN ACT TO PROVIDE FOR THE REGULATION, CONTROL AND MANAGEMENT OF DOG RACING IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९ जुलै १९७६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

**महाराष्ट्र राज्यात कुत्र्यांच्या शर्यतींचे विनियमन, नियंत्रण आणि व्यवस्थापन आणि त्याच्याशी संबंधित बाबीं यांसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र राज्यात कुत्र्यांच्या शर्यतींचे विनियमन, नियंत्रण आणि व्यवस्थापन व त्याच्याशी संबंधित बाबी यांसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६ असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अमलात येईल.

२. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(अ) "कुत्र्यांची शर्यत", म्हणजे, ज्यामध्ये यांत्रिक साधनाद्वारे पुढे लोटल्या जाणाऱ्या वस्तूचा कुत्रे पाठलाग करतात अशी शर्यत ;

(ब) "शर्यतीची जागा" म्हणजे, जेथे कुत्र्यांची शर्यत घेता येईल असे कोणतेही मैदान ;

(क) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमासोबत जोडलेली अनुसूची.

लायसन्स न दिलेल्या कुल्यांच्या शर्यतींच्या जागांवर कुल्यांची शर्यत लावण्यास मनाई.

३. (१) ज्या शर्यतींच्या जागेबाबत या अधिनियमाच्या उपबंधानुसार दिलेले कुल्यांच्या शर्यतीं-बाबतचे लायसन्स अमलात आहे अशा शर्यतींच्या जागव्यतिरिक्त कोणत्याही शर्यतींच्या जागेवर कोणतीही कुल्यांची शर्यत घेण्यात येणार नाही.

(२) अशा लायसन्सच्या अटी शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येतील.

कुल्यांच्या शर्यतीसाठी लायसन्स.

४. (१) कोणत्याही शर्यतीच्या जागेच्या मालकास, पट्टेदारास किंवा भोगवटादारास अशा शर्यतीच्या जागेवर कुल्यांच्या शर्यतींबाबतच्या लायसन्ससाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल.

(२) राज्य शासनास, असे लायसन्स रोखून ठेवता येईल किंवा ते, त्याला योग्य वाटेल अशा शर्तीच्या अधीन राहून व अशा कालावधीसाठी देता येईल. अशा शर्तींमध्ये पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल:—

(अ) लायसन्स फी देणे ;

(ब) निरनिराळ्या प्रकारच्या कुल्यांवर लावता येण्याजोगी पैजांची रक्कम ;

(क) राज्य शासनाच्या मते, ज्यांसाठी लायसन्समध्ये तरतूद करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशा कुल्यांच्या शर्यतींशी प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे संबंध असलेल्या इतर बाबी.

(३) राज्य शासनास, अशा लायसन्सद्वारे लायसन्सधारकास, राज्य शासन, अशा लायसन्समध्ये विनिर्दिष्ट करील अशा शर्तींस अधीन राहून, या राज्यामधील किंवा त्याबाहेरील शर्यतीची जागा असणाऱ्या एखाद्या कुल्यांच्या शर्यतीच्या जागेवर घेण्यात येणाऱ्या कुल्यांच्या शर्यतीच्या संबंधात कोणत्याही बुकमेकरास आपला धंदा किंवा व्यवसाय चालवण्यासाठी किंवा बुकमेकर म्हणून किंवा टर्फ कमिशन एजंट म्हणून काम करण्यासाठी परवाना देण्यास प्राधिकृत करता येईल. लायसन्सधारकास योग्य वाटेल अशा, लायसन्सधारकास दिलेल्या लायसन्सच्या कालावधीपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीसाठी असा परवाना देता येईल.

(४) राज्य शासनास, या कलमान्वये दिलेले कोणतेही लायसन्स, ते ज्या शर्तींच्या अधीन देण्यात आले असेल त्यांपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास, कोणत्याही वेळी रद्द करता येईल.

लायसन्स न दिलेल्या शर्यतींच्या जागेवरील कुल्यांच्या शर्यतींमध्ये भाग घेतल्या-बद्दल शास्ती.

५. ज्या कोणत्याही शर्यतीच्या जागेच्या संबंधात, या अधिनियमाच्या कलम ४ च्या उपबंधा-नुसार दिलेले लायसन्स अमलात नसेल अशा शर्यतीच्या जागेवरील कुल्यांच्या शर्यतींमध्ये जी व्यक्ती भाग घेईल तिला दोषसिद्धीनंतर दोनशे रुपयांपर्यंत असेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

लायसन्स न दिलेल्या ठिकाणी कुल्यांच्या शर्यती घेऊ दिल्याबद्दल मालक इत्यादींस शास्ती.

६. ज्या कोणत्याही शर्यतीच्या जागेच्या संबंधात या अधिनियमाच्या कलम ४ च्या उपबंधा-नुसार दिलेले लायसन्स अमलात नसेल अशा शर्यतीच्या जागेवर एखादी कुल्यांची शर्यत घेण्यात आली तर अशा शर्यतीच्या जागेचा मालक, पट्टेदार किंवा भोगवटादार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस दोषसिद्धीनंतर एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

७. (१) या अधिनियमाच्या कलम ४ च्या उपबंधांनुसार जिला लायसन्स देण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती असे लायसन्स ज्या शर्तींच्या अधीन देण्यात आले असेल त्यापैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन करील तर अशा व्यक्तीस दोषसिद्धीनंतर एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. लायसन्सच्या शर्तींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

(२) या अधिनियमाच्या कलम ४, पोट-कलम (३) च्या उपबंधानुसार लायसन्सधारकाकडून ज्याला परवाना देण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा परवाना ज्या शर्तींच्या अधीन देण्यात आला असेल अशा कोणत्याही शर्तींचे उल्लंघन करील तर तिला, दोषसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

८. महानगर दंडाधिकाऱ्यापेक्षा किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यापेक्षा कनिष्ठ असणारे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही. या अधिनियमाखालील अपराधांची दखल.

९. राज्य शासनाला, शासकीय राजपत्रात वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करून कोणत्याही कुत्र्यांच्या शर्यतीला या अधिनियमाच्या प्रवर्तनामधून सूट देता येईल. माफी

१०. (१) राज्य शासनाला, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अमलात येईल किंवा यथास्थिति येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यांमुळे ह्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

११. अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अधिनियमांमध्ये अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत सुधारणा करण्यात येईल. विवक्षित अधिनियमांची सुधारणा.

अनुसूची

(कलम ११ पहा)

| अधिनियमाचे नाव<br>१ | सुधारणा<br>२ |
|---|---|
| १. मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ (सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४). | कलम ३ मध्ये,—<br>(१) "घोड्यांच्या शर्यतीत" या शब्दाऐवजी "घोड्यांच्या शर्यतीत किंवा कुत्र्यांच्या शर्यतीत" हे शब्द दाखल करण्यात येतील,<br>(२) खंड (ब) मध्ये, "१९१२" या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :— |

| अधिनियमाचे नाव<br>१ | सुधारणा<br>२ |
|---|---|
| | "किंवा यथास्थिति, महाराष्ट्र कुल्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६, ". |
| २. मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १). | कलम ३, पोट-कलम (१) मध्ये, " १९१२ " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—<br>"किंवा महाराष्ट्र कुल्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६," ; |
| ३. मुंबई पण कर अधिनियम, १९२५ (सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६). | (१) कलम ४ मध्ये,—<br>(एक) खंड (१) मध्ये, " घोडयांच्या शर्यतीत " या मजकुरानंतर "किंवा कुल्यांच्या शर्यतीत" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;<br>(दोन) खंड (५) मध्ये, " १९१२ " या मजकुरानंतर पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :—<br>"किंवा महाराष्ट्र कुल्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६," ;<br>(तीन) खंड (सहा) मध्ये,—<br>(अ) " १९१२ " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—<br>"किंवा महाराष्ट्र कुल्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६, " ;<br>(ब) " घोडयांच्या शर्यतीत " या मजकुरानंतर " किंवा कुल्यांच्या शर्यतीत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;<br>(चार) खंड (सात) मध्ये " १९१२ " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—<br>" किंवा यथास्थिति, महाराष्ट्र कुल्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६, " ;<br>(२) कलम ६ मध्ये, " घोडयांच्या शर्यतीत " या मजकुरानंतर " किंवा कोणत्याही कुल्यांच्या शर्यतीत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.<br>(३) कलम ८ मध्ये, " १९१२ " या मजकुरानंतर " किंवा यथास्थिति, महाराष्ट्र कुल्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम, १९७६ " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.